ePaper

║ वर्ष - 8 । अंक -111 ║ UDYAM-MH-26-0158827║

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ║ मंगळवार, दिनांक 29 ऑक्टोंबर 2024 ║ पुणे आवृत्ती ║ mahaenews.com ║ maha_enews ║ Mahaenews

## चिंचवडमध्ये नाना काटे 'अपक्ष' निवडणुकीच्या मैदानात!



### आतील पानांत


- रोहित फार काळ टिकू शकला नाही
- वाईड बॉलवर फलंदाज कसा बाद होतो?
- सम-समान फॉर्म्युल्यावर प्रश्नचिन्ह!
- तांडेलाचे डोके ; कापून बोट दिली पेटवून!


### उमेदवारीसाठी डावलल्यामुळे रवि लांडगे अपक्ष मैदानात

# भोसरी महाविकास आघाडीत बंड!

**मला एबी फॉर्म मिळणार होता.. मात्र, आजी-माजी प्रस्थापितांनी पैशाच्या खेळ आणि उमेदवारी कापली!**

। पिंपरी ।

महाईन्यूज । प्रतिनिधी

**भोसरी विधानसभा मतदार संघात मोठा ट्विस्ट आला आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि माजी नगरसेवक रवि लांडगे यांना उमेदवारीबाबत डावलण्यात आले. त्यामुळे मी अपक्ष निवडणूक लढणार आहे, असा निर्धार त्यांनी केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये बंडाची ठिणगी पडली आहे. विशेष म्हणजे, माझी उमेदवारी कापण्यासाठी आजी-माजी प्रस्थापितांनी पैशाची ताकद वापरली, असा गंभीर आरोपही रवि लांडगे यांनी केला आहे.**



विधानसभा निवडणुकीसाठी पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीकडून इच्छुकांनी गेल्या तीन महिन्यांपासून जोरदार तयारी केली होती. भोसरी मतदार संघातून शिवसेना ठाकरे गटाचे रवि लांडगे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अजित गव्हाणे यांच्यात उमेदवारीसाठी जोरदार रस्सीखेच होती. या मतदार संघामध्ये शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे.

किंबहुना, पूर्वी माजी आमदार स्व. गजानन बाबर या परिसराचे नेतृत्व केले होते. तसेच, शिवसेना संघटिका सुलभा उबाळे यांनी शिवसेनेच्या तिकीटावर २००९ मध्ये प्रस्थापित उमेदवाराला तगडे आव्हान दिले होते.

२०१४ मध्ये भाजपा आणि शिवसेना स्वतंत्रपणे लढली. त्यावेळीसुद्धा सुलभा उबाळे यांना निर्णायक मते मिळाली होती. परिणामी, या मतदार संघामध्ये शिवसेना ठाकरे गटाची ताकद आहे. तसेच, लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचा एकही तगडा नेता नसताना शिवसैनिकांनी प्रामाणिकपणे काम केले. मात्र, विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला शहरातील एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे शिवसैनिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

दरम्यान, उमेदवारी डावलल्यानंतर रवि लांडगे यांनी 'निर्धार मेळावा' घेतला. यावेळी त्यांच्या समर्थकांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर सडकून टीका केली आहे.

**खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यावर टीका**

जागावाटपाच्या चर्चेमध्ये शिरूर लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पक्षपातीपणा केला. ज्यांनी लोकसभा निवडणुकीत त्यांच्या विरोधात कामे केले. त्यांच्यासाठी आणि ठेकेदारीसाठी आर्थिक देवाण-घेवाण करणाऱ्यांना साथ दिली, असा गंभीर आरोपही रवि लांडगे समर्थकांनी केला.

### लांडगे कुटुंबियांचा कायम घात झाला

रवि लांडगे यांनी भोसरीच्या राजकारणामध्ये लांडगे कुटुंबियांचा आजवर कसा घात झाला, याचा पाडाच वाचला. गावातील राजकारण्यांनी ही वेळ माझ्यावर आणली, अशी उद्विग्नताही त्यांनी बोलून दाखवली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी माझ्या वडीलांनी १९७८ साली निवडणूक लढवली होती. त्यावेळी भाजपा पक्षसुद्धा स्थापन झाला नव्हता. त्यावेळी त्यांचा पराभव झाला. १९८६ मध्ये वडिलांसोबत विश्वासघात झाला. १९९२ मध्ये वडील निवडून आले. त्यावेळी १४ नगरसेवक भाजपाच्या तिकीटावर निवडून आले. स्व. अंकुश लांडगे शहराध्यक्ष, नगरसेवक झाले. त्यांनी प्रत्येक घटकाला सोबत घेतले. भोसरीतील सर्व प्रस्थापिपत राजकारण्यांवर अंकुश लांडगे यांची कृपा आहे. ते आमदार झाले असते. पालकमंत्री झाले असते, पण त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. २०१४ मध्ये सुलभा उबाळे यांचे काम केले. महापलिका निवडणुकीत २०१२ मध्ये सर्वांनी एक होवून माझा पराभव झाला. माझ्या पाठीत वार केला. २०१७ मध्ये मी बिनविरोध निवडून आलो. पण, माझ्या बंधुंना माझ्या वॉर्डमध्ये उमेदवारी दिली. विद्यमान आमदारांनी एकप्रकारे विरोधच केला. पाच वर्षे मला पदापासून वंचित ठेवले. अशा लोकांना पदे दिली. ज्यांना लाच लुचपत विभागाने अटक केली, अशी टीकाही रवि लांडगे यांनी केली आहे.

### शरद पवार यांचा शिवसेना संपवण्याचा डाव...

पिंपरी विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांच्या पक्षाला जागा सुटल्याने उद्धव ठाकरे यांचे शिवसैनिक नाराज झाले आहेत. शिवसैनिकांनी बैठक घेऊन शहरातील तीनही पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे काम न करण्याचा ठराव केला आहे. शरद पवार यांनी पुणे जिल्ह्यात शिवसेना संपवण्याचा डाव केला आहे. असा आरोप ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांच्यासह शिवसैनिकांनी केला आहे. पिंपरी- चिंचवड मधील आकुर्डी येथील सेना भवन येथे ही बैठक पार पडली. महाविकास आघाडीत बंडखोरी होण्याची चिन्हे आहेत. नुकतीच शरद पवार यांच्या पक्षाची दुसरी यादी जाहीर झाली. यादीत पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी सुलक्षणा शिलवंत यांचं नाव जाहीर करण्यात आलं. पिंपरी विधानसभा मतदारसंघात शहराध्यक्ष सचिन भोसले यांच्यासह माजी आमदार गौतम चाबुकस्वार इच्छुक होते. याबाबत त्यांनी पक्षश्रेष्ठींची भेट देखील घेतली होती.



# ‘मिग 29’ विमानासाठी महत्त्वपूर्ण संशोधन

## विज्ञान वार्ता: पुण्यातील ‘एनसीएल’कडून नवी प्रणाली विकसित

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मिग २९ या लष्कराच्या लढाऊ विमानातील ऑक्सिजन निर्मिती वाढवण्यासाठीचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील (एनसीएल) शास्त्रज्ञांनी या बाबतचे संशोधन केले असून, विमानाच्या ऑन बोर्ड ऑक्सिजन जनरेशन सिस्टिमचे (ओबीओजीएस) पुनरुज्जीवन करण्यात आले आहे.**



भारतीय वायुसेनेच्या विनंतीनुसार २०२३ मध्ये संशोधन प्रकल्प सुरू करण्यात आला होता. एनएसएलमधील अजैविक रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय बोकाडे, डॉ. प्रशांत निफाडकर यांनी विद्यार्थ्यांच्या चमूसह संशोधन केले. मिग २९ विमानामध्ये अति उंचीवर वैमानिकांना सतत ऑक्सिजन पुरवठा करणारी ओबीओजीएस ही प्रणाली नायट्रोजन शोषून ऑक्सिजन तयार करण्यासाठी झिओलाइट घटकांवर अवलंबून असते. मात्र, कालांतराने ओलाव्यामुळे झिओलाइटची कार्यक्षमता कमी होते. या अनुषंगाने शास्त्रज्ञांनी पुनरुज्जीवन प्रक्रिया विकसित केली. त्याद्वारे ओबीओजीएस प्रणालीतील ऑक्सिजनची निर्मिती ३० टक्क्यांवरून ८५ टक्क्यांपर्यत वाढली.

या बाबतच्या चाचण्या नाशिक येथे वायुसेनेच्या तळावर करण्यात आल्या. त्यानंतर पुनरुज्जीवित प्रणाली मिग २९ विमानांमध्ये कार्यान्वित करण्यात येत आहेत.

प्रकल्पाबाबत डॉ. बोकाडे म्हणाले, की एनसीएलने ऑक्सिजनचे प्रमाण वाढवण्यासाठी झिओलाइटचे नवे तंत्रज्ञान विकसित केले आहे. झिओलाइटचा स्वदेशी विकासामुळे ओबीओजीएस प्रणालीची दीर्घकालीन कार्यक्षमता सुनिश्चित झाली आहे. चाचण्यांमध्ये ऑक्सिजन शुद्धता ९३ टक्के असल्याचे दिसून आले. त्यामुळे अति उंचीवरील उत्कृष्ट कामगिरी आणि सुरक्षितता निश्चित झाली आहे. नवी प्रणाली मिग २९ विमानांमध्ये कार्यान्वित करण्यास सुरुवात झाली आहे.

### मिग-29 बाबत थोडक्यात माहिती...

मिग २९ याचा कमाल वेग २४०० कि.मी. प्रतितास आहे. या विमानाचा पल्ला ८५० कि.मी. आहे. हवेत उडत असतानाच यात इंधन भरल्यास याचा पल्ला ३५०० कि.मी.पर्यंत वाढतो. इ.स १९८६ मध्ये भारतीय हवाई दलात सामील झालेल्या मिग-२९ एस या विमानांवर आधारीत मिग-२९ के ही नौदलासाठी निर्मिलेली आवृत्ती आहे. युद्धाच्या काळात शत्रूच्या दळणवळण यंत्रणेत अडथळे निर्माण करण्यासाठी जॅमर म्हणूनही याचा उपयोग करता येतो. हे दोन आसनी विमान असून यामध्ये मागील वैमानिकाच्या आसनाखाली एक जास्तीची इंधन टाकी बसविण्यात आलेली आहे. त्यामुळे आणीबाणीच्या वेळी इंधन वाहक विमानाची भूमिकाही हे विमान घेऊ शकते.

---

# कोथरुडमधील भाजपा महायुती अभेद्य!

## अमोल बालवडकरांचा बंड थंड,चंद्रकांत पाटील यांच्या प्रचारात सक्रीय !

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**विधानसभा निवडणुकीत प्रचाराला सुरवात झाली असून प्रचाराला रंग चढत आहे. तर दुसरीकडे अनेक मतदारसंघांमध्ये नाराजीनाट्य पहायला मिळत आहे. अशातच कोथरुडमधून विद्यमान आमदार चंद्रकात पाटील यांना पुन्हा एकदा मतदारसंघातून निवडणूक लढण्याची संधी मिळाली आहे. अशातच अमोल बालवडकर हे नाराज असून अपक्ष फॉर्म भरणार होते. मात्ष आता त्यांनी बंडाचं निशाण मागे घेत आपली तलवार म्यान केल्याचे पहायला मिळत आहे.**



मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अमोल बालवडकर यांच्या घरी जात त्यांची भेट घेतली अन् बालवडकरांची नाराजी दूर झाली आहे. चंद्रकांत पाटलांनी बालवडकरांची समजूत काढली. चंद्रकांत पाटलांना अमोल बालवडक यांची नाराजी दूर करण्यात यश आले आहे. बालवडकरांनी पाठिंबा जाहीर करुन चंद्रकांत पाटलांना पेढा देखील भरवला आहे.. आता बालवडकर हे अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार नाहीत हे स्पष्ट झाले आहे. बालवडकर हे आता चंद्रकांत पाटलांना पाठिंबा देत या विधानसभेला प्रचारासाठी मैदानात उतरणार आहेत.

‘प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः’ या तत्त्वावर भाजप निष्ठेने जनतेची सेवा करत आला आहे. मी या पक्षाचा एक भाग असल्याचा मला प्रचंड अभिमान आहे. त्यामुळे जनतेची सेवा करणे हा उद्देश नेहमीच राहिला आहे आणि तो एक लोकप्रतिनिधी या नात्याने पूर्ण देखील केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कोथरूडमधील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मी निवडणूक लढवणार अशी इच्छा व्यक्त केली होती. सुरुवातीपासून भाजपच्या वतीने मला उमेदवारी मिळावी यासाठी मी आग्रही होतो.

भाजपच्या माध्यमातून चंद्रकांत पाटील यांना संधी मिळाली, काही गोष्टींवरून आमचे मतभेद होते, मात्र आज ते मतभेद माझे नेते आणि राज्याचे भाजपचे सक्षम उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून दूर झाले आहेत. त्यामुळे आज कोथरूड विधानसभा मतदारसंघातून माझी उमेदवारी मी मागे घेत असून चंद्रकांत पाटील यांना पाठिंबा देत आहे’, असे अमोल बालवडकर म्हणाले आहेत.

### कोथरुडमध्ये रोमहर्षक लढती...

आगामी निवडणुकीत पुन्हा एकदा कोथरूड मध्ये भाजपाचा झेंडा फडकावण्यासाठी मी कटिबद्ध राहील आणि चंद्रकांतदादांच्या प्रचारार्थ मेहनत घेईल. विशेष म्हणजे या विधानसभेच्या सर्व प्रक्रियेत माझ्या सोबत असणारी जनता आणि कार्यकर्ते यांना विचारूनच मी हा निर्णय घेतला आहे. शेवटी जनतेच्या शब्दाबाहेर मी कधीच जाणार नाही आणि येणाऱ्या काळात जनतेच्या हितासाठी अहोरात्र झटत राहील’, असं म्हणत अमोल बालवडकरांनी चंद्रकांत पाटलांनी पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. दरम्यान, आता कोथरुडमध्ये तिहेरी लढत पाहायला मिळणार आहे. भाजपकडून चंद्रकांत पाटील, महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे चंद्रकांत मोकाटे, मनसेचे किशोर शिंदे यांच्यात सामना रंगणार असून कोण हा मतदारसंघ काबीज करणार हे पाहणं औत्सुक्याचं आहे.

# सुरक्षेच्या मुद्द्यावर महिला “आश्वस्त”!

## चिखलीत संवाद मेळावा: ग्रामस्थांनी सांगितली माय माऊलींच्या मनातील गोष्ट

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बदलापूरच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता. अनेक माय माऊली घाबरल्या होत्या. शाळेत जाणाऱ्या आपल्या मुलींबाबत काळजीत होत्या. त्यावेळी भोसरी मतदारसंघांमधील एकमेव व्यक्तीसमोर आली. ज्यांनी शहरातील तमाम भगिनींना आश्वस्त केले.**



“एकतर माझ्या शहरात अशी घटना घडूच देणार नाही, आणि चुकून जर माझ्या भगिनींना कोणत्याही प्रकारचा त्रास झालाच”तर भर चौकात अशा नराधमांना ठेचून काढील”. असे सांगणारी व्यक्ती म्हणजे भोसरी मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे होते. त्यांच्या एका वाक्याने आमच्या भगिनी निश्चित झाल्याचे चिखली टाळगाव मधील ग्रामस्थांनी सांगितले.

. भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ चिखली टाळगाव येथे ग्रामस्थांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी मेळाव्यामध्ये ग्रामस्थांनी गेल्या दहा वर्षांतील बदल अधोरेखित करतानाच आमदार महेश लांडगे यांच्या ‘हट्ट्रीक’ साठी ग्रामस्थ सज्ज आहेत, असे सांगितले. ही निवडणूक समाविष्ट गावांच्या भविष्यातील नियोजनबद्ध, शाश्वत विकासासाठी येथील नागरिकांनी हातात घेतली आहे, असा विश्वास ग्रामस्थांनी दिला.

**भाजपाच्या माध्यमातून राज्याचा विकास...**

संवाद मेळाव्यामध्ये आपल्या भावना व्यक्त करताना ग्रामस्थांनी सांगितले की, भाजपाच्या माध्यमातून राज्याचा विकास होऊ शकतो. त्यामुळे आपल्याला आपल्या भागातून भाजपच्या शिलेदारांना अर्थात भाजपच्या उमेदवारीवर उभे असलेल्या उमेदवारांना निवडून देणे गरजेचे आहे. यावेळी नागरिकांनी विरोधकांच्या उमेदवारीवर देखील बोट ठेवले. विरोधक कितीही फेक नेरेटिव्ह सेट करू द्या, आम्हाला माहित आहे आमदार महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभा मतदारसंघात गेल्या दहा वर्षांत कोणते “भगीरथ” प्रयत्न केले आहेत, अशा देखील भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

### ...तर विरोधकांची पळता भुई थोडी होईल!

चिखली टाळगावमधील नागरिक ग्रामस्थांनी माझ्याबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या त्या माझ्यासाठी महत्त्वाच्या आहेत. तुम्हीच माझी ताकद आहात. असे कार्यकर्ते, त्यांचे निस्वार्थी प्रेम विकत घेऊन मिळत नसते. त्यांच्यासोबत मित्र म्हणून राहायला लागते, त्यांना आपले व्हिजन पटायला लागते तेव्हाच ते आपलेसे होतात. खोट्या आरोपांच्या जिवावर हे सहकारी मिळत नसतात आणि खोट्याच्या जीवावर निवडणूका लढवल्या जात नाहीत त्यासाठी व्हिजन लागते. खोट्या आरोपांचा भडिमार तुम्ही सुरू केलाय पण ज्या दिवशी मी सत्याची दवंडी पिटेन त्या दिवशी त्यांची पळता भुई थोडी होईल, इशाराही आमदार महेश लांडगे यांनी दिला आहे.

# चिंचवड, भोसरी, पिंपरीतील उमेदवारांनी भरले अर्ज

## विधानसभा निवडणूक : शंकर जगताप आणि आण्णा बनसोडे यांचे शक्तीप्रदर्शन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील तीनही मतदार संघातील महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले चिंचवडमधून महायुतीचे शंकर जगताप, पिंपरीतून आण्णा बनसोडे यांनी, तर अपक्ष उमेदवार म्हणून नाना काटे यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. तसेच, भोसरी मतदार संघातून महाविकास आघाडी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अजित गव्हाणे यांनी उमेदवादी अर्ज दाखल केला आहे.**





या पदयात्रेला सुमारे ५० हजारांहून अधिक कार्यकर्ते व नागरिक स्वयंस्फूर्तीने उपस्थित होते. विशेषतः महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून तसेच घरांच्या छतावरून नागरिकांनी शंकर जगताप यांच्यावर जोरदार पुष्पवृष्टी केली. नागरिकांचा हा उत्स्फूर्त उत्साह आणि पदयात्रेला उपस्थित कार्यकर्त्यांची गर्दी पाहून ही पदयात्रा म्हणजे शक्तिप्रदर्शन नसून ही महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या महाविजयी यात्रेची पूर्वतयारी असल्याची भावना, यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, अर्ज भरल्यानंतर शंकर जगताप यांनी पदयात्रेत सहभागी झालेल्या महायुतीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि चिंचवड विधानसभेतील नागरिकांचे मनापासून आभार व्यक्त केले. तसेच चिंचवड विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला अशीच मनापासून साथ आणि आशीर्वाद द्या, असे आवाहन जगताप यांनी यावेळी केले.

दरम्यान, मागील काही दिवसांपासून ज्यांच्या नाराजीची चर्चा सुरू होती ते भाजपचे माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, भाजप उपाध्यक्ष राम वाकडकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक राजेंद्र जगताप यांनी या पदयात्रेत सहभागी होत आम्ही शंकर जगताप यांच्यासोबत असून त्यांना मताधिक्याने आमदार करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊन काम करणार असल्याचे स्पष्ट करत या नाराजीच्या चर्चेला पूर्णविराम दिला.

### मविआत मतभेद नाहीत : अजित गव्हाणे

गेल्या दहा वर्षातील भोसरी विधानसभेमधील विद्यमान आमदारांचा कारभार पाहिला तर ठराविक लोकांना डोळ्यासमोर ठेवून दिले गेलेले टेंडर, फुगवलेले एस्टिमेट आणि त्यातून ढासळलेली कामाची गुणवत्ता हेच दिसून येईल. अगदी छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याच्या कामात कामाची हीच ढासळलेली गुणवत्ता दिसून आली. महाविकास आघाडीने हा मुद्दा समोर आणला. मात्र या सर्व कारभारावर महाराष्ट्र भर पिंपरी चिंचवडचे नाव मलीन झाल्याची घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे भोसरी येथील अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांनी केली. शहरातील तिन्ही मतदारसंघांमध्ये आम्ही एकत्रपणे, एकसंधपणे निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष यांच्यात कुठलेही मतभेद नाही. दोन दिवसात सगळे पदाधिकारी एकाच व्यासपीठावर महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करताना दिसून येतील, असेही अजित गव्हाणे यावेळी म्हणाले.






# प्राधान्य हवे महिला-मुलांच्या सुरक्षिततेला

**राज्यात विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारकडून 'लाडकी बहीण योजने'ची जोरदार जाहिरात सुरू आहे. अडीच कोटी महिला मतदारांच्या खात्यात निवडणुकीच्या आधी चार महिन्यांचे पैसे जमा झालेले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांना नेमके काय हवे आहे, याची चर्चा न होता, महिलांची अशी मागणी नसताना सरकारी तिजोरीतून हे पैशांचे वाटप झाले आहे.**



अशा अनुत्पादक योजनांवर अतिरेकी खर्च केल्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था कोसळली आहे.वास्तविक राज्यातील सर्वच महिलांना सुरक्षितता हवी आहे. महाराष्ट्रात दररोज महिला अत्याचारांच्या १२१ आणि लहान बालकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या ५५ तक्रारी दाखल होतात. यात गंभीर स्वरूपाच्या अत्याचारांचे प्रमाण मोठे आहे. २०२१ च्या तुलनेत २०२३ मध्ये महिला व बालकांवरील अत्याचारांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या महिन्याभरात अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या ८९ तक्रारी नोंदवल्या गेल्या. गेल्या आठ महिन्यांत राज्यातून २६ हजार महिला, तरुणी बेपत्ता झाल्या आहेत. जानेवारी २०२३ ते जुलै २०२४ या काळात ८० लहान मुले गायब आहेत. बेपत्ता झालेल्या १८ वर्षाखालील मुलींची संख्या सहा हजारांपेक्षा अधिक आहे. राज्यात महिला असुरक्षित आहेत याचा ही आकडेवारी म्हणजे आरसाच आहे.मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात गेल्या पाच महिन्यांत महिलांवरील अत्याचाराचे १४६ गुन्हे दाखल झाले आहेत. विनयभंगाची २५३ प्रकरणे उघडकीस आली आहेत. जुलै महिन्यामध्ये ठाण्याजवळील शिळफाटा येथील मंदिरातील तीन पुजाऱ्यांनी एका महिलेवर मंदिर परिसरात लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली होती. उरणमध्ये देखील एका तरुणीची अशीच अत्याचार करून निर्घृण हत्या करण्यात आली. मे २०२४ च्या अखेरपर्यंत मुंबई पोलिसांनी पोक्सो बाललैंगिक अपराधांपासून संरक्षण अंतर्गत कायद्याप्रमाणे ५०९ गुन्हे नोंदवले आहेत. गेल्या वर्षी या काळात ४६५ गुन्ह्यांची नोंद झाली होती. मुंबईत विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.१३ ऑगस्ट २०२४ रोजी बदलापूर येथील शाळेतील दोन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले. त्यानंतर २२ ऑगस्टपर्यंत महाराष्ट्रात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या पुणे, अकोला, मुंबई, लातूर, नाशिक, कोल्हापूर, नागपूर या शहरांमध्ये दहा घटना घडल्या. हा लेख लिहित असताना २५ ऑक्टोबरला चिचोंडी पाटील, ता. नगरच्या अंगणवाडी सेविकेची अंगणवाडीत विनयभंग करून निर्घृण हत्या झाली. निवडणूक प्रचारात विरोधकांच्या कुटुंबातील स्त्रियांविषयी बोलताना काही पुढाऱ्यांचे भान सुटलेले आहे. राज्यात लाडक्या बहिणींच्या, स्त्रियांच्या व अल्पवयीन मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बदलापूर घटनेतील आरोपीला तळोजा तुरुंगातून बदलापूरला नेत असताना पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत तो ठार झाला. या घटनेनंतर महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांचे पिस्तूल हातात घेऊन 'बदला पूरा' असा मजकूर असलेले पोस्टर्स लागले होते. हे सत्ताधाऱ्यांनी झुंडशाहीचे केलेले उघडउघड समर्थन आहे. वास्तविक कायद्याच्या चौकटीत गुन्ह्यांचा संवेदनशीलतेने तपास करणे, योग्य साक्षी पुरावे गोळा करणे आणि न्यायालयात आरोपपत्र दाखल करून गुन्हेगाराला शिक्षा होईल असे काम करण्याची जबाबदारी पोलिसांवर असते. पोलीस न्यायाधीश होऊन लोकांना मारायला लागले तर न्याययंत्रणा व लोकशाही धोक्यात येते. बलात्कारासारखे अत्याचार घडतात तेव्हा जनतेतून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली जाते. आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोन्हे यांनी ज्या पद्धतीने फाशी आणि चकमकीचे समर्थन केले ते म्हणजे संसदीय पदाच्या मर्यादांचा भंग होता.यानिमित्ताने फाशीच्या शिक्षेच्या संदर्भात चर्चा होणे गरजेचे आहे. आपल्या देशात संविधान निर्मितीपासून कायमच फाशीच्या शिक्षेबाबत गंभीर चर्चा झालेली आहे. २०१२ मध्ये दिल्लीतील निर्भया अत्याचारानंतर तत्कालीन केंद्र सरकारने मानवाधिकार आयोगाचे पूर्वअध्यक्ष अत्याचारासंबंधीच्या कायद्यात दुरुस्तीसाठी समिती नेमली होती.

## प्रासंगिक »

### पंचतारांकितांचे पायाभूत

***...त्यामुळे वांद्रे येथे चेंगराचेंगरीत जखमी झालेल्यांची दखल कोणीही घेतली नाही आणि घेतली जाणारही नाही, हे कटू वास्तव मान्य करण्याखेरीज पर्याय नाही.***

साधारण सात वर्षांपूर्वी मुंबईच्या एल्फिन्स्टन रोड स्थानकात सकाळी साडेदहाच्या सुमारास चेंगराचेंगरी होऊन दोन डझन मुंबईकरांचे प्राण गेले. सकाळी साडेदहा ही गर्दीची वेळ. मुंबईकर चाकरमाने लाखांच्या संख्येत या वेळी एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे आपले अस्तित्व मुठीत घेऊन जिवाच्या आकांताने धावत असतात. खरे तर अशा प्रचंड गर्दीच्या वेळी चेंगराचेंगरीचे प्रसंग नित्यनेमाने घडत असतात. त्यात जीव जात नाहीत, इतकेच. पण २०१७ साली २९ सप्टेंबरास ते अनेकांचे गेले. दोन दिवसांपूर्वी वांद्रे स्थानकात झालेली चेंगराचेंगरी ही रामप्रहरी झाली आणि तीत अनेक जायबंदी झाले; सुदैवाने कोणाचा जीव गेला नाही. दुसरे असे की जे जबर जखमी झाले ते मुंबईचे स्थानिक नोकरदार नाहीत. हे सर्व उत्तर प्रदेशातील आपापल्या गावी दिवाळीसाठी निघालेले स्थलांतरित.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या गरजांचा नीट विचार करत त्यांना नेहमीच अत्यंत चांगली वागणूक दिली आहे. सेवानिवृत्त होऊ घातलेल्या आयएएस - आयपीएस अधिकाऱ्यांना सरकारी जमिनी ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर दिल्या जात असत.

# मला अखेरपर्यंत याच घरात रहायचे आहे...



त्या घेऊन हे अधिकारी सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करतील आणि त्या जागेच्या आकारमानानुसार १४ ते २० फ्लॅट्स किंवा त्याहून अधिक सदनिका असलेली इमारत बांधतील, अशी कल्पना त्यामागे होती.उदाहरणार्थ मी राहतो त्या सोसायटीमध्ये, २० आयपीएस अधिकारी एकत्र आले आणि प्रत्येकाने तीन लाखांहून अधिक खर्च करून तळमजला अधिक दहा मजल्यांची इमारत बांधली, प्रत्येक मजल्यावर दोन फ्लॅट होते. सरकारच्या नियमानुसार प्रत्येक थ्री बीएचके फ्लॅटचे चटई क्षेत्र (कार्पेट एरिया) १,०७० चौ.फूट आहे. सोसायटी दरवर्षी सरकारला भाडे देते, तसेच मुंबई महानगरपालिकेला घरपट्टी भरते.सर्व सोसायट्या सह-निबंधकांकडे नोंदणीकृत आहेत. प्रत्येक सोसायटीमध्ये सदस्यांच्या संख्येनुसार निवडून आलेला अध्यक्ष, एक सचिव आणि पाच ते आठ समिती सदस्य असतात. गृहनिर्माण संस्थेच्या नियमांनुसार व्यवस्थापकीय समितीला सोसायटी किंवा तिच्या सदस्यांच्या सामान्य समस्यांचे निराकरण करण्यासाठी दर महिन्याला बैठक घेणे बंधनकारक असते.सरकारी भाडेपट्ट्याच्या जमिनीवर सोसायट्या असल्याने त्यांना कोणत्याही बाबतीत मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी लागते आणि फ्लॅट मालकाच्या मृत्यूनंतर फ्लॅटच्या विक्रीसाठी किंवा वारस हक्कांसाठी त्यांची मंजुरी घ्यावी लागते. एखाद्या फ्लॅट मालकाला त्याचा/ तिचा फ्लॅट भाड्याने द्यायचा असेल तर ते तो फक्त सरकारला भाड्याने देऊ शकतात. मग सरकार तो फ्लॅट सरकारी अधिकाऱ्यांना नाममात्र भाड्याने देते. भाड्याचे पैसे फ्लॅट-मालकाच्या बँक खात्यात जमा केले जातात. अलीकडेच, आमदारांनीही त्यांनाही अशा पद्धतीने फ्लॅट मिळावेत अशी मागणी केली आणि सरकारने त्यांनाही भाडेतत्त्वावर जमीन दिली. त्यांनी सरकारने घातलेल्या अटींकडे दुर्लक्ष करत जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय सदनिका विकल्या किंवा भाड्याने दिल्या. तशी प्रकरणे नोंदवली गेली आहेत. राजकारण्यांना शिस्त लावणे सरकारला अवघड गेले. त्याऐवजी, सरकारने सर्वांसाठी नियम शिथिल केले आणि जे सरकारी कर्मचारी नव्हते (परंतु ज्यांना बाजार दर देणे परवडत होते) त्यांना ते फ्लॅट्स विकायला आणि ते भाड्याने द्यायला आमदारांना परवानगी दिली. भाडेतत्त्वाने दिलेल्या सरकारी जमिनीवर बांधलेल्या फ्लॅट्सचा व्यापार सुरू होण्याची ही नांदी होती. सध्याच्या भाजपप्रणित सरकारने तर त्याच्याही एक पाऊल पुढे टाकले आहे. सोसायट्यांना भाडेपट्ट्यावरील जमीन मालकी पट्ट्यात रूपांतरित करण्यासाठी जमिनीच्या मूल्याच्या पाच टक्के नाममात्र दराने दिली जाईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महायुतीमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण?

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विधानसभेचं बिगूल वाजलं आहे, प्रचारात रंगत आली असून, सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. उद्या विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील घटक पक्षांनी जवळपास सर्वच जागांवर आता उमेदवारांची घोषणा केली आहे. राज्याची सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता हा सामना महाविकास आघाडी विरोधात महायुती असाच रंगणार आहे. मात्र अजूनही दोन्ही कडून देखील मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराची घोषणा करण्यात आलेली नाहीये. महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार कोण असणार? यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलत होते.**



उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात जबाबदारी मिळणार, अशी चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. यावर आता फडणवीस यांनीच मोठा खुलासा केला आहे. ते एका टीव्ही वाहिनीच्या सत्ता संमेलनमध्ये बोलत होते. मी नेहमीच सांगतो जेव्हा दिल्लीच्या पत्रकारांकडे काही बातम्या नसतात तेव्हा ते अशा बातम्या करतात, असं होत नाही. कोणतीही अशी ऑफर नाही. भाजपमध्ये व्यक्ती किंवा नेते निर्णय घेत नाहीत तर पार्लमेंट्री बोर्ड निर्णय घेते असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी महायुतीमध्ये निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण असेल यावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. महाविकास आघाडीनं मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरवला की आम्ही देखील लगेच घोषणा करू, आमच्याकडे चेहरा आहे. त्यांच्याकडे आहे का त्यांना विचारा. निवडणुकीनंतर अजित पवार, एकनाथ शिंदे आणि आमचं पार्लमेंट्री बोर्ड बसून याबाबत निर्णय घेतील असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाविकास आघाडी जेव्हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करेल त्याच्या 15 मिनिटांत आम्ही आमचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करू. आमचे प्रमुख एकनाथ शिंदे आहेत. त्यांच्या नेतृत्वात आम्ही निवडणूक लढवत आहोत. आमच्याकडे चेहरा आहे. त्यांच्याकडे कोणता चेहरा आहे हे त्यांना विचारा.निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण होणार याचा निर्णय, एकनाथ शिंदे, अजित पवार आणि आमच्या पार्लमेंट्री बोर्डाचे लोक बसून घेतील. ते जे निर्णय घेतील त्यांच्यासोबत आम्ही राहू. आमचा फॉर्म्युला ठरला नाही. स्ट्राईक रेट आमचा सर्वांचा चांगला आहे. आम्ही तिन्ही नेते बसू आणि निर्णय घेऊ. ज्या काही थिअरीज चालवल्या जात आहेत त्यात दम नाही, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलता त्यांनी उद्धव ठाकरेंवर देखील जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री राहिलेले आहेत. मोठे नेते आहेत. मात्र कधी कधी ते लेव्हल सोडून देतात. मी त्यांना एक गोष्ट सांगतो, कोई किसी की हस्ती मिटा नही सकती. राजनीती में किसी को समाप्त करना है तो केवल जनता करती है. कोणत्याही नेत्यात ताकद नाही. जनताच ते करू शकते. दुसऱ्यांचं अस्तित्व संपवण्याची कोणत्याही नेत्यात ताकद नाही. राजकारणात आणि लोकशाहीत जनताच कुणालाही कधी संपवू शकतो, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.मी काही राजपत्र घेऊन आलो नाही, ताम्रपत्र घेऊन आलो नाही, प्रचारात रंगत आली असून, सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. उद्या विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील घटक पक्षांनी जवळपास सर्वच जागांवर आता उमेदवारांची घोषणा केली आहे. राज्याची सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता हा सामना महाविकास आघाडी विरोधात महायुती असाच रंगणार आहे.

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

मी नेहमीच सांगतो जेव्हा दिल्लीच्या पत्रकारांकडे काही बातम्या नसतात तेव्हा ते अशा बातम्या करतात. असं होत नाही, कोणतीही अशी ऑफर नाही. भाजपमध्ये व्यक्ती किंवा नेते निर्णय घेत नाहीत. पार्लमेंट्री बोर्ड असते तेच निर्णय घेतात. माझा पक्ष दिल्लीत जायला सांगेल तर मी दिल्लीत जाईल. मुंबईत राहायला सांगितलं तर मुंबईत राहील. माझ्या पक्षाने सांगितलं तुमचा उपयोग नाही घरी बसा तर घरी बसेल. माझ्या मनात हेच आहे, देवेंद्र फडणवीस हे आपल्या मनाने चालत नाहीत, पक्षाच्या मनाने चालतात. पार्टीने जेव्हा सांगितलं तेव्हा एका मिनिटात उपमुख्यमंत्री झालो. पाच वर्ष मुख्यमंत्री राहिलेलो पक्षाच्या आदेशानंतर मी उपमुख्यमंत्री झालो.


# ठाकरेसेनेवर बहिष्कार टाका!

## काँग्रेसच्या नेत्याचं मुस्लिम समुदायाला आवाहन; मतांचं गणित मांडलं

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ठाकरेसेनं विधानसभा निवडणुकीच्या तिकीट वाटपात मुस्लिमांना महत्त्व न दिल्यानं काँग्रेसचे माजी आमदार युसूफ अब्राहनी यांनी समुदायाची बैठक बोलावली. या बैठकीला मुस्लिम समुदायातील अनेक संघटनांचे सदस्य हजर होते. विधानसभा निवडणुकीत मुस्लिम समुदायानं ठाकरेसेनेवर बहिष्कार टाकावा, असा प्रस्ताव युसूफ अब्राहनी यांनी बैठकीत मांडला.**





लोकसभा निवडणुकीत मुस्लिम समुदायानं महाविकास आघाडीला भरभरुन मतदान केलं. काही मतदारसंघांमध्ये तर ठाकरेंचे उमेदवार मुस्लिम मतांमुळे जिंकले, असा दावा युसूफ अब्राहनी यांनी केला. यासाठी त्यांनी भायखळ्याचं उदाहरण दिलं. भायखळ्यात मुस्लिम मतदारांचं प्रमाण ४१ टक्के आहे. दक्षिण मुंबईतून लोकसभा लढलेल्या ठाकरेसेनेच्या अरविंद सावंत यांना भायखळा विधानसभा मतदारसंघातून ८६ हजार ८८३ मतं मिळाली. तर त्यांच्या विरोधी उमेदवार असलेल्या शिंदेसेनेच्या यामिनी जाधव यांना केवळ ४० हजार ८१७ मतं पडली, अशी आकडेवारी युसूफ अब्राहनी यांनी मांडली. विशेष म्हणजे जाधव या भायखळ्याच्या विद्यमान आमदार आहेत. जाधव आता शिंदेसेनेकडून विधानसभा निवडणूक लढणार आहेत. ठाकरेंनी इथून मनोज जामसुतकर यांना तिकीट दिलं आहे. भायखळ्याच्या जागेवरुन काँग्रेस आणि ठाकरेसेनेत बरीच रस्सीखेच झाली.

### समुदायाशी काहीही देणंघेणं नाही

काँग्रेसला ही जागा सुटली असती, तर तिथून युसूफ अब्राहनी यांचं तिकीट जवळपास निश्चित मानलं जात होतं. ते सहज निवडूनही आले असते, असं त्यांच्या समुदायाच्या लोकांना आणि नेत्यांना वाटतं. भायखळ्याची जागा अब्राहनी यांच्या पक्षानंच शिवसेनेसाठी सोडली. मग आता अब्राहनी ठाकरेंच्या उमेदवारांवर बहिष्कार घालण्याची मागणी का करत आहेत, असा सवाल ठाकरेंचे नेते सुभाष देसाईंनी विचारला. आम्ही वर्सोवा मतदारसंघातून हारुन खान यांना उमेदवारी दिली आहे. अब्राहनी यांना बहुधा त्याची कल्पना नसावी, असा टोला देसाईंनी लगावला. अब्राहनी यांना समुदायाशी काहीही देणंघेणं नाही.

# सम-समान फॉर्म्युल्यावर प्रश्नचिन्ह!

## मविआच्या जागा वाटपात काँग्रेस शंभरी पार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मविआतील जागावाटपाचा घोळ अद्यापही संपलेला नाही. काही दिवसांपूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत नाना पटोले यांनी ८५-८५-८५ चा फॉर्म्युला जाहीर केला होता. त्यानुसार मविआताली प्रमुख तीन घटकपक्षांना समसमान जागा देणार असल्याचं जाहीर केलं. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी बाळासाहेब थोरातांनी ९०-९०-९० चा फॉर्म्युला जाहीर केला. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत जाहीर केलेल्या यादीनुसार काँग्रेसने १०० उमेदवार घोषित केले आहेत. त्यामुळे मविआतील समसमान फॉर्म्युल्याचं काय झालं? हा प्रश्न अधोरेखित होत आहे.**



काँग्रेसने २४ ऑक्टोबर रोजी ४८ जणांची नावे जाहीर केली होती. तर, २६ ऑक्टोबरला २३ नावे जाहीर केली. त्यादिवशी रात्री १६ जणांना उमेदवारी देण्यात आली. तर आज १४ जणांची नावे जाहीर करण्यात आली आहे. यांची बेरीज करता काँग्रेसने आतापर्यंत १०१ उमेदवार जाहीर केले आहेत. परंतु, सचिन सावंत यांचं कालच्या यादीत नाव होतं, त्यांचं नाव बदलून आजच्या यादीत अशोक जाधव यांचं नाव जाहीर करण्यात आलं. त्यामुळे काँग्रेसचे एकूण १०० उमेदवार जाहीर झालेले आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ येऊन ठेपल्याने उमेदवार याद्या जाहीर केले जात आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे), मनसेने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसनेही उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसच्या आताच्या यादीतून १४ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. अंधेरी पश्चिममधून उमेदवार बदलण्यात आला आहे.

कालच्या यादीत सचिन सावंत यांना उमेदवारी दिली होती. परंतु, या जागेवरून त्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर आज या जागेवरून अशोक जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाविकास आघाडीचा समसमान वाटपाचा फॉर्म्युला ठरला होता. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत जाहीर केलेल्या यादीनुसार काँग्रेसने शंभरी पार केली आहे. त्यामुळे मविआच्या समसमान जागा वाटपाचं काय झालं? असा प्रश्न उपस्थित होत आहे.मविआतील जागावाटपाचा घोळ अद्यापही संपलेला नाही. काही दिवसांपूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत नाना पटोले यांनी ८५-८५-८५ चा फॉर्म्युला जाहीर केला होता. त्यानुसार मविआताली प्रमुख तीन घटकपक्षांना समसमान जागा देणार असल्याचं जाहीर केलं. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी बाळासाहेब थोरातांनी ९०-९०-९० चा फॉर्म्युला जाहीर केला. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत जाहीर केलेल्या यादीनुसार काँग्रेसने

### अर्ज भरण्याची शेवटची तारीख

आहेत. काँग्रेसच्या आताच्या यादीतून १४ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. अंधेरी पश्चिममधून उमेदवार बदलण्यात आला आहे. कालच्या यादीत सचिन सावंत यांना उमेदवारी दिली होती. परंतु, या जागेवरून त्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर आज या जागेवरून अशोक जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे.महाविकास आघाडीचा समसमान वाटपाचा फॉर्म्युला ठरला होता. परंतु, काँग्रेसने आतापर्यंत जाहीर केलेल्या यादीनुसार काँग्रेसने शंभरी पार केली आहे. त्यामुळे मविआच्या समसमान जागा वाटपाचं काय झालं? असा प्रश्न उपस्थित होत आहे.त्यामुळे काँग्रेसचे एकूण १०० उमेदवार जाहीर झालेले आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ येऊन ठेपल्याने उमेदवार याद्या जाहीर केले जात आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे), मनसेने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसनेही उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसच्या आताच्या यादीतून १४ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत.

१०० उमेदवार घोषित केले आहेत. त्यामुळे मविआतील समसमान फॉर्म्युल्याचं काय झालं? हा प्रश्न अधोरेखित होत आहे. काँग्रेसने २४ ऑक्टोबर रोजी ४८ जणांची नावे जाहीर केली होती. तर, २६ ऑक्टोबरला २३ नावे जाहीर केली. त्यादिवशी रात्री १६ जणांना उमेदवारी देण्यात आली. तर आज १४ जणांची नावे जाहीर करण्यात आली आहे. यांची बेरीज करता काँग्रेसने आतापर्यंत १०१ उमेदवार जाहीर केले आहेत. परंतु, सचिन सावंत यांचं कालच्या यादीत नाव होतं, त्यांचं नाव बदलून आजच्या यादीत अशोक जाधव यांचं नाव जाहीर करण्यात आलं. त्यामुळे काँग्रेसचे एकूण १०० उमेदवार जाहीर झालेले आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ येऊन ठेपल्याने उमेदवार याद्या जाहीर केले जात आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे), मनसेने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता काँग्रेसनेही उमेदवार जाहीर केले.

# खलाशाने तांडेलाचे डोके ; कापून बोटं दिली पेटवून!

## कोस्टगार्ड च्या मदतीने बाकीच्या खलाशांना वाचविण्यात यश

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मानसिक संतुलन बिघडलेल्या खलाशाने चक्क तांडेलचे डोके कापून बोट पेटवून दिली. देवगड समुद्रात ही घटना सोमवारी सकाळी घडल्याने खळबळ उडाली. कोस्टगार्ड च्या मदतीने बाकीच्या खलाशांना वाचविण्यात यश आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, देवगड येथील समुद्रात रत्नागिरी व आजूबाजूच्या परिसरातील मोठ्या प्रमाणावर बोटी मच्छीमारीसाठी गेलेल्या होत्या. त्यामध्ये रत्नागिरी राजीवडा येथील रफिक फणसोपकर यांची बोट मच्छीमारीसाठी देवगड बंदरात गेलेली होती. मच्छीमारी करत असतानाच मानसिक संतुलन बिघडलेल्या खलाशाने चक्क तांडेलाचे डोके कापले आणि ते डोकं बोटीवर ठेवून दिले. त्यानंतर संपूर्ण बोटीला आग लावली. या आगीमध्ये बोट मालकाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. यावेळी आजूबाजुला असलेल्या

### लोकांना वाचवण्याचा प्रयत्न

देवगड येथील समुद्रात रत्नागिरी व आजूबाजूच्या परिसरातील मोठ्या प्रमाणावर बोटी मच्छीमारीसाठी गेलेल्या होत्या. त्यामध्ये रत्नागिरी राजीवडा येथील रफिक फणसोपकर यांची बोट मच्छीमारीसाठी देवगड बंदरात गेलेली होती. मच्छीमारी करत असतानाच मानसिक संतुलन बिघडलेल्या खलाशाने चक्क तांडेलाचे डोके कापले आणि ते डोकं बोटीवर ठेवून दिले. यावेळी आजूबाजुला असलेल्या रत्नागिरीतील काही मच्छीमार बोटीवरील लोकांनी जळणा-या बोटीवरच्या तीस ते पस्तीस लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला.

रत्नागिरीतील काही मच्छीमार बोटीवरील लोकांनी जळणा-या बोटीवरच्या तीस ते पस्तीस लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानंतर कोस्टगार्डला पाचारण करण्यात येऊन बोटीवरच्या इतर खलाशांचे प्राण वाचविण्यात आले. या घटनेतील मृत तांडेल हा जयगड येथील असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र तांडेलचे डोके कापणा-या खलाशाचे अद्याप नाव समजू शकले नाही. या घटनेमुळे रत्नागिरीतील मच्छिमार व्यवसायिकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

# 'अलबत्या गलबत्या' करणार विश्वविक्रम

प्रायोगिक, व्यावसायिक नाट्यसृष्टीच्या युगात सध्याच्या घडीला लहान मुलांसाठी काही विशेष नाटकं रंगभूमीवर आली आणि या नाटकांनी लहानांसोबत मोठ्यांचीही मने जिंकली. 'अलबत्या गलबत्या' हे नाटकही त्यापैकीच एक. रत्नाकर मतकरी लिखित हे नाटक रंगभूमीवर आणण्याचं शिवधनुष्य निर्माते राहुल भंडारे यांनी उचलले आणि या बालनाट्यानं इतिहास घडवला. तुफान लोकप्रियता मिळवणारं 'अलबत्या गलबत्या' नाटक आता एका नव्या विश्वविक्रमासाठी सज्ज झालं आहे.झी मराठी प्रस्तुत आणि अद्वैत थिएटर निर्मित 'अलबत्या गलबत्या' या नाटकाची टीम येत्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला सलग ६ प्रयोग करत मराठी बालरंगभूमीच्या इतिहासात पहिल्यांदाच जागतिक विक्रम करण्यासाठी सज्ज झाले आहेत. सकाळी ७.०० ते रात्री १०.३० यावेळेत हे ६ विश्वविक्रमी प्रयोग दादरच्या श्री शिवाजी मंदिर मध्ये रंगणार आहेत.मराठी रंगभूमीवर 'मैलाचा दगड' ठरलेल्या या नाट्यकृतीचा अशा प्रकारचा प्रयोग कलाकार, तंत्रज्ञ या सर्वांनाच एक मोठं आव्हान असलं तरी कलावंतांना हा नाट्यानुभव खूप काही शिकवणारा असेल असं मत निर्माते राहुल भंडारे यांनी व्यक्त केलं. हा भव्य नाट्यपट एकाच दिवशी, एकाच थिएटरमध्ये एकापाठोपाठ बघणं म्हणजे नाट्यरसिकांसाठी पर्वणीच आहे. या सलग नाट्यानुभवाच्या संकल्पनेला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून या नाटकाची जोरदार तिकीटविक्री सुरु झाली आहे. स्वातंत्र्यदिनी स्वातंत्र्याचा आनंद अधिक द्विगुणित करायचा असेल तर छत्रपती शिवाजी मंदिर ट्रस्ट यांच्या सहयोगाने 'अलबत्या गलबत्या' नाटकाचे होणारे हे सलग प्रयोग अजिबात चुकवू नका.अनेक विक्रमांना गवसणी घालत 'अलबत्या गलबत्या' बालनाट्याची घौडदौड सुरू आहे. कोविडचा काळ सोडला तर ६ वर्षात ८०० प्रयोगांचा टप्पा पार केला आहे आणि विक्रमी १००० व्या प्रयोगाकडे वाटचाल सुरू आहे.



# निक्कीचा राग अनावर

'बिग बॉस मराठी'च्या घरात पहिल्या दिवसापासूनच अनेक कमाल गोष्टी घडत आहेत. सदस्यांना अडचणीत आलेलं पाहून 'बिग बॉस'प्रेमींना मात्र मजा येत आहे. 'बिग बॉस'ने सदस्यांच्या तोंडचं पाणी पळवलं आहे. सदस्यांचं पाणी बंद केल्यानंतर आणि त्यांना उपाशी ठेवल्यानंतर आता 'बिग बॉस'ने सदस्यांना जमिनीवर आणलं आहे. वर्षा उसगांवकरांमुळे जमिनीवर झोपावं लागणार असल्याने निक्की तांबोळीचा राग अनावर झालेला आजच्या भागात पाहायला मिळेल. 'बिग बॉस मराठी'च्या पहिल्या दिवशी काहीही काम नसल्याने वर्षा उसगांवकर झोपल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यासकट घरातील इतर सदस्यांनाही 'बिग बॉस'ने शिक्षा दिलेली आजच्या भागात प्रेक्षकांना पाहायला मिळेल.

'बिग बॉस मराठी'च्या नव्या प्रोमोमध्ये 'बिग बॉस' म्हणत आहेत,"आपल्याला बेडचा वापर करण्याची परवानगी नाही". 'बिग बॉस'च्या या आदेशानंतर घरातील सर्व सदस्य चिंतेत येतात. वर्षा उसगांवकर 'बिग बॉस'ला म्हणाल्या,"चुकून झालं". त्यावर पारा चढलेली निक्की म्हणते,"आम्हाला भोगावं लागतंय..तुमच्यामुळे आता आम्हाला जमिनीवर झोपावं लागतंय". यावर वर्षा म्हणतात,"माझ्या एकटीमुळे नाही". त्यावर निक्की म्हणते,"तुम्ही झोपला होतात तेव्हा तुमची अक्कल कुठे गेली होती". निक्कीला शांत करत वर्षा ताई म्हणतात,"आरडाओरडा करू नको". तरीही निक्की शांत बसत नाही उलट त्यांना प्रतिउत्तर देत त्यांनाच शांत बसण्यास सांगते. 'बिग बॉस मराठी'च्या घरातील सदस्यांना आता बेडचा वापर करता येणार नाही.

निक्की आणि वर्षाताईंचा चढलेला पारा 'बिग बॉस' प्रेमींना मनोरंजनाची मेजवानी देणारा ठरेल. तर 'बिग बॉस'च्या घरातील सदस्यांना जमिनीवर झोप लागेल का? हे पाहण्यासाठी आजचा



# विकी कौशलच्या फोनचा वॉलपेपर होतोय व्हायरल

बॉलीवूड सुपरस्टार विकी कौशल आणि कतरिना कैफ इंडस्ट्रीमधील लोकप्रिय कपल आहे. दोघांना आदर्श कपल अशी उपमा दिली जाते. या कपलचे चाहते सोशल मीडियावर त्यांचे व्हिडीओ शेअर करत असतात. आता विकी-कॅटच्या चाहत्यांनी एका व्हिडीओमध्ये एक अशी गोष्ट पाहिली आहे की ज्याची चर्चा सध्या सगळीकडेच सुरू आहे.विकीचा आगामी चित्रपट 'बॅड न्यूज' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान विकीने सोशल मिडिया इन्फ्लूएन्सर रुही दोसानी हिच्याबरोबर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत रुही विकीकडे ऑटोग्राफ मागायला जाताना दिसत आहे आणि तिने विकीकडे ऑटोग्राफसाठी पेन देताच तो पेनच बंद पडतो, अशी एक कॉमेडी रील दोघांनी शूट केली आहे.व्हिडीओच्या सुरूवातीला जेव्हा विकी त्याच्या फोनमध्ये व्यग्र असतो त्याच क्षणाला त्याच्या फोनमध्ये कतरिनाच्या बालपणीचा फोटो वॉलपेपर ठेवलेला दिसतो आणि संपूर्ण व्हिडिओमधील नेमका तो फोटो चाहत्यांनी पाहिला आणि आता हा फोटोदेखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.गेल्या काही महिन्यांपासून विकी आणि कतरिना गुडन्यूज देणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण विकी कौशलने याच चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च सोहळ्यात या अफवांना पूर्णविराम दिला होता. विकी म्हणाला होता की, " आतासाठी आम्ही घेऊन येत असलेली बॅड न्यूज तुम्ही एन्जॉय करा, जेव्हा वेळ येईल तेव्हा आम्ही ती बातमी तुम्हाला नक्कीच देऊ."दरम्यान, विकी कौशलच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, विकी



# ह्यांचं सगळं ओक्केमध्ये एकदम!

मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचं ब्रेकअप झाल्याच्या चर्चा सध्या सोशल मिडीयावर सुरु होत्या. या दोघांनी एकमेकांच्या नातेवाईकांना अनफॉलो केल्याने दोघांच्या ब्रेकअपच्या बातम्यांमध्ये खरंच काहीतरी तथ्य आहे, अशी चर्चा सुरु झाली. पण आता या सर्व अफवा असल्याचं समजतंय. आता हे दोघे सार्वजनिक ठिकाणी स्पॉट झाल्याने या सर्व अफवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. ते अजूनही एकत्र आहेत आणि सर्व काही ठीक आहे. रविवारी अर्जुन आणि मलायका एकत्र स्पॉट झाले होते. रविवारी मुंबईत पाऊस पडत असताना मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर जेवणासाठी बाहेर गेले होते. दोघांनी एकत्र जेवण केले आणि जेव्हा दोघे बाहेर आले तेव्हा पापाराझींनी त्यांना स्पॉट केले. यादरम्यान दोघेही काही न बोलता थेट त्यांच्या गाडीत बसले. दोघांनाही असे एकत्र पाहून चाहत्यांनीही कमेंट बॉक्समध्ये प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. काहींनी सांगितले की देवाचे आभार मानतात की दोघे एकत्र आहेत आणि त्यांचे ब्रेकअप झाले नाही. त्याचवेळी एका यूजरने मलायका अरोराच्या व्हाइट कलरच्या आउटफिटचे कौतुक केले.

# रोहित फार काळ टिकू शकला नाही

## सोशल मीडियावर चाहत्यांनी रोहित-कोहलीला प्रश्न केला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय संघाच्या न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या दोन कसोटी सामन्यातील पराभवामुळे चाहते प्रचंड संतापले आहेत. भारताचे दोन्ही दिग्गज खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा फलंदाजीत सपशेल फ्लॉप झाले. रोहित शर्मा फार काळ मैदानावर टिकू शकला नाही, तर कोहलीही मिचेल सँटनरविरुद्ध अपयशी ठरला. या दोन्ही खेळाडूंची बॅट शांत असल्याने संघाला याचा मोठा फटका बसला. टीम इंडियाच्या या दोन सर्वात अनुभवी फलंदाजांच्या चाहत्यांनी आता त्यांची चांगलीच शाळा घेतली आहे. सोशल मीडियावर चाहत्यांनी रोहित-कोहलीला थेट प्रश्न केला आहे की ते आंतरराष्ट्रीय सामन्यांपूर्वी देशांतर्गत क्रिकेटमध्ये सराव का करत नाहीत.**




न्यूझीलंडविरूद्धच्या आधी बेंगळुरू आणि नंतर पुणे दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये भारताचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, दोन्ही स्टार फलंदाजांनी चाहत्यांची निराशा केली. पुणे कसोटीच्या पहिल्या डावात रोहितला खातेही उघडता आले नाही. तर दुसऱ्या डावात हिटमॅन केवळ ८ धावा करून बाद झाला. कोहली बॅटही शांत होती. कोहली पहिल्या डावात केवळ एक धाव करून बाद झाला. कसाबसा का होईना विराट दुसऱ्या डावात १७ धावा करण्यात यशस्वी ठरला.सलग दोन सामन्यात फ्लॉप झाल्यानंतर चाहत्यांनी कोहली-रोहितवर जोरदार टीका केली. या दोन दिग्गज फलंदाजांना देशांतर्गत क्रिकेटमध्ये न खेळण्याबाबत चाहत्यांनी थेट प्रश्न विचारला आहे. चाहत्यांचे म्हणणे आहे की, ”क्रिकेटचा देव’ सचिन तेंडुलकर वयाच्या ४०व्या वर्षी रणजी ट्रॉफीमध्ये खेळू शकतो, तर रोहित-कोहली का नाही?’रोहित-विराटला अनेक माजी खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा सल्ला दिला आहे. इतकंच नव्हे तर या मोठ्या कसोटी मोसमापूर्वी भारतीय कसोटी संघातील बरेच खेळाडू विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळत होते. तर जेव्हा जेव्हा खेळाडू आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सहभागी होत नाहीत,न्यूझीलंडविरूद्धच्या आधी बेंगळुरू आणि नंतर पुणे दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये भारताचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, दोन्ही स्टार फलंदाजांनी चाहत्यांची निराशा केली. पुणे कसोटीच्या पहिल्या डावात रोहितला खातेही उघडता आले नाही. तर दुसऱ्या डावात हिटमॅन केवळ ८ धावा करून बाद झाला. कोहली बॅटही शांत होती. कोहली पहिल्या डावात केवळ एक धाव करून बाद झाला. कसाबसा का होईना विराट दुसऱ्या डावात १७ धावा करण्यात यशस्वी ठरला.सलग दोन सामन्यात फ्लॉप झाल्यानंतर चाहत्यांनी कोहली-रोहितवर जोरदार टीका केली. या दोन दिग्गज फलंदाजांना देशांतर्गत क्रिकेटमध्ये न खेळण्याबाबत चाहत्यांनी थेट प्रश्न विचारला आहे. चाहत्यांचे म्हणणे आहे की, ”क्रिकेटचा देव’ सचिन तेंडुलकर वयाच्या ४०व्या वर्षी रणजी ट्रॉफीमध्ये खेळू शकतो, तर रोहित-कोहली का नाही?’रोहित-विराटला अनेक माजी खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा सल्ला दिला आहे. इतकंच नव्हे तर या मोठ्या कसोटी मोसमापूर्वी भारतीय कसोटी संघातील बरेच खेळाडू विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळत होते. तर जेव्हा जेव्हा खेळाडू आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सहभागी होत नाहीत, तेव्हा देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसतात. बीसीसीआयने देखील हा नियम सर्वांसाठी केला आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा देशांतर्गत क्रिकेट खेळून बराच काळ लोटला आहे. कोहलीने शेवटचा रणजी सामना २०१२ मध्ये खेळला होता. तर सचिन तेंडुलकरने शेवटचा रणजी सामना २०१३ मध्ये खेळला होता. म्हणजे सचिनच्या निवृत्तीपूर्वी भारताच्या या प्रसिद्ध देशांतर्गत स्पर्धेत कोहली शेवटचा दिसला होता. दुसरीकडे, रोहित शर्मा शेवटचा देशांतर्गत क्रिकेटमधील सामना २०१६ मध्ये खेळला होता. कोहलीला देशांतर्गत क्रिकेट खेळून १२ वर्षे झाली आहेत, तर भारतीय कर्णधारही ८ वर्षांपासून देशांतर्गत क्रिकेट खेळलेला नाही. तेव्हा देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसतात. बीसीसीआयने देखील हा नियम सर्वांसाठी केला आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा देशांतर्गत क्रिकेट खेळून बराच काळ लोटला आहे.

### रोहित शर्मा फलंदाजीत सपशेल फ्लॉप

कोहलीने शेवटचा रणजी सामना २०१२ मध्ये खेळला होता. तर सचिन तेंडुलकरने शेवटचा रणजी सामना २०१३ मध्ये खेळला होता. म्हणजे सचिनच्या निवृत्तीपूर्वी भारताच्या या प्रसिद्ध देशांतर्गत स्पर्धेत कोहली शेवटचा दिसला होता. दुसरीकडे, रोहित शर्मा शेवटचा देशांतर्गत क्रिकेटमधील सामना २०१६ मध्ये खेळला होता. भारतीय संघाच्या न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या दोन कसोटी सामन्यातील पराभवामुळे चाहते प्रचंड संतापले आहेत. भारताचे दोन्ही दिग्गज खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा फलंदाजीत सपशेल फ्लॉप झाले.

# वाईड बॉलवर फलंदाज कसा बाद होतो?

## ICC चा ‘तो’ नियम? ज्यावरून धोनीच्या बायकोने घातलेली हुज्जत

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा माजी कर्णधार एमएस धोनी याचा एक व्हीडिओ सध्या पाहायला मिळत आहे, ज्यामध्ये धोनी पत्नी साक्षीबरोबर एक क्रिकेट सामना पाहतानाचा किस्सा सांगत आहे. टीव्हीवर एकदिवसीय सामना पाहत असताना साक्षी आणि त्याचे फलंदाज बाद आहे की नाबाद यावरून चर्चा सुरू होती.**





धोनी किस्सा सांगताना म्हणाला, “आम्ही घरी बसून वनडे सामना पाहत होतो. त्यादरम्यान गोलंदाजाने चेंडू टाकला आणि तो वाईड देण्यात आला. फलंदाज तो चेंडू खेळण्यासाठी क्रीझपासून पुढे गेला आणि स्टंपिंगमुळे बाद झाला. तितक्यात साक्षी बोलायला लागली की तो आऊट नाही आहे. तर धोनी म्हणाला की वाईड चेंडूवर फलंदाज स्टंपिंगमुळे बाद होऊ शकतो, फक्त नो बॉलवर बाद होऊ शकत नाही. पण साक्षीचं म्हणणं होतं की, फलंदाज आऊट नाहीय कारण तो वाईड बॉल होता. साक्षी मात्र तिचं म्हणणं पटवून देत राहिली आणि फलंदाज मैदानाबाहेर गेला. वाईड बॉल असल्याने फलंदाज बाद नाहीय, असं साक्षीचं म्हणणं होतं. पण याबाबत आयसीसीचा नेमका नियम काय आहे, जाणून घेऊया. वाईड बॉल असूनही फलंदाज स्टंप आऊट झाला. आयसीसीच्या नियमांनुसार, वाइड चेंडूवर फलंदाज स्टंपिंगमुळे बाद होऊ शकतो. जर तो क्रिझच्या बाहेर असेल आणि यष्टिरक्षकाने चेंडूने त्रिफळा उडवला तर अंपायरला फलंदाजाला बाद घोषित करावे लागेल. फलंदाजी करणाऱ्या संघाची विकेटही पडेल आणि अतिरिक्त धावाही मिळतील. आयसीसीच्या या नियमानुसार वाईड चेंडू बाद झाल्याने दोन्ही

### फलंदाजाला आऊट करता येत नाही

फलंदाजी करणाऱ्या संघाला वाइडच्या नियमानुसार एक अतिरिक्त धावही मिळेल आणि चेंडूही मोजला जाणार नाही. तर गोलंदाजी करणाऱ्या संघाला विकेटही मिळेल. येथे दोन्ही पंचांना निर्णय द्यावा लागतो.गोलंदाजीच्या टोकावरील अंपायर वाइड सिग्नल करतील, तर स्ट्रायकरच्या टोकावरील पंच फलंदाज आऊट असल्याचे संकेत देतील. तर धोनीने सांगितल्याप्रमाणे चेंडू नो बॉल असल्यास फलंदाजाला स्टंपिंग करून आऊट करता येत नाही.